# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
## (दुपार)

जा.क्र. २२/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १२/०१/२०१८

**१) संगनमत करुन महिलेस अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन मारण्या पिटण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद :-**

दिनांक ११/०१/२०१८ चे १७.३० वाजता. दरम्यान यातील आरोपीने संगनमत करुन घरचा कचरा जाळण्याच्या कारणावरुन फिर्यादी व सुन यांचे सोबत भांडण करुन थापड बुक्यांनी मारपीट केली? व आरोपी क्र. १ ने अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन मारण्या पिटण्याची धमकी दिल्याने फिर्यादी यांचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम २९४,३२३,५०६,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मनगटे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

**२) रानगव्याच्या हल्यात जखमी होवुन उपचारा दरम्यान महिलेचा मृत्यु . :-**

दिनांक १७/१२/२०१८ चे १४.०० वाजता. दरम्यान यातील मृतक श्रीमती लक्ष्मी दुधराम हिंगे वय ६५ वर्ष, रा. सालेबर्डी ही दिनांक १७/१२/१७ ला रानगव्याच्या हल्यात जखमी झाल्याने तिला उपजिल्हा रुग्णालय साकोली येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने डॉक्टरी मेमोवरुन पो. स्टे. साकोली येथे मर्ग क्र. ००१७/२०१८ कलम १७४ जा. फौ. चे कागपत्र पो.स्टे. ला प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पो. हवा. बावनकर यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन दिघोरी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. तलमले पो.स्टे दिघोरी हे करीत आहेत.

**३) गळफास लावुन इसमाचा मृत्यु . :-**

दिनांक ११/०१/२०१८ चे १२.३० वा. ते १८.३० वाजता. दरम्यान यातील मृतक प्रितम अनंत बघेले वय १८ वर्ष, रा. सालेभाटा याने आपले राहते घराचे मयालीला नायलॉन दोरीने गळफास घेवुन मरण पावल्याने फिर्यादी मुरली आगाजी बघेले वय ६५ वर्ष, रा. सालेभाटा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. टेभुर्णीकर पो.स्टे लाखनी हे करीत आहेत.

**४) औषधोपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु . :-**

दिनांक १०/०१/२०१८ चे १८.०० वाजता. दरम्यान यातील मृतक एकनाथ रघुजी सिडाम वय ४० वर्ष, रा. लाखांदुर प्लॉट याने कोणतेतरी विषारी औषधी प्राशन केल्याने त्यास औषधोपचाराकरीता ग्रा. रु. लाखांदुर येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने वैद्यकिय अधिकारी ग्रा. रु. लाखांदुर यांचे मेमो वरुन सरतर्फे फिर्यादी पोहवा. भलावी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भलावी पो.स्टे लाखांदुर हे करीत आहेत.

<u>५) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—</u>

दिनांक १२/०१/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १०८ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी – ०३ तीन सिटर वाहनांवरती– ०८ केसेस व ईतर वाहनांवरती –९७ केसेस करण्यात आले आहे.

(एस. व्ही. कुलकर्णी )
**पोलीस उपअधिक्षक (गृह)**
**भंडारा**
**दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५**

**प्रति,**

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.